Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI | ISSUE- IV | APRIL | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# उस्मानाबाद जिल्ह्यातील मंदिरे आणि धार्मिक पर्यटन

**अंकुश बुध्दिवंत गरूड,**
संशोधक विद्यार्थी एम.ए., (इतिहास), बी.एड.
ankushgarud777@gmail.com

## प्रास्ताविक :

ऐतिहासिक व सामाजिक परंपरा असलेला व पुरोगामी विचारांचा ‘उस्मानाबाद’ जिल्हा धार्मिक पर्यटनातही अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या श्री. क्षेत्र तुळजाभवानी मंदिरात देश-विदेशातून भाविक दर्शनाला येतात. दिगंबर जैनांचे सर्वात भूषण ठरलेले सिध्दक्षेत्र कुंथलगिरी हे एक प्रसिध्द देवस्थान आहे. धार्मिक, ऐतिहासिक आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त असलेल्या ‘तेर’ मधील त्रिविक्रम मंदिर[1] हे अतिप्राचीन मंदिरापैकी एक आहे. या मंदिराला धार्मिक अधिष्ठान तर प्राप्त आहेच शिवाय ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीयदृष्ट्या देखील हे मंदिर महत्त्वाचे ठरते. माणकेश्वर मंदिर हे एक प्रसिध्द हेमाडपंती मंदिर याच जिल्ह्यात स्थित आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वेगळी ओळख दाखविणारे धार्मिक पर्यटनस्थळे (तीर्थस्थळे) आहेत. प्राचीन मंदिरासाठी प्रसिध्द असलेल्या उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यातील बहुतांश मंदिरे चालुक्यकालीन व हेमाडपंती शैलीची आहेत.

सुरुवातीच्या काळात पर्यटन हे ‘धार्मिक’ घटकांशीच संबंधित असलेले दिसून येते. त्यामुळे धार्मिक स्थळांना पर्यटनांच्या दृष्टीने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. स्थानिक इतिहास, संस्कृती व प्राचीन मंदिरांनी समृध्द असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील धारासूरमर्दीनी देवीच्या नावावरून ‘धाराशिव’ म्हणून ओळखले जाते. धारासूरमर्दीनी देवीच्या नावावरून जिल्हास ‘धाराशिव’[2] नाव पडल्याचे दिसून येते. स्थानिक समृध्द इतिहास, परंपरा आणि धार्मिक पर्यटनस्थळामुळे प्राचीन मंदिर वास्तूकलेचा वारसा यामुळे अलीकडील काळात उस्मानाबाद जिल्ह्यास नवी ओळख प्राप्त झाली आहे.

## उद्दिष्ट्ये :

१) उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनस्थळे अभ्यासणे.
२) उस्मानाबाद जिल्ह्यातील मंदिरांचा अभ्यास करणे.

## गृहितके :

१) उस्मानाबाद जिल्हा धार्मिक तसेच ऐतिहासिक वारसा, परंपरेने समृध्द आहे.
२) प्राचीन मंदिर परंपरेमुळे उस्मानाबाद जिल्हा ‘धार्मिक पर्यटनस्थळ’ म्हणून नावारूपास येत आहे.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध-निबंधासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. यात प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने व इंटरनेटचा वापर केला आहे.

## शोध-निबंध विषयाचे महत्त्व :

उस्मानाबाद जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व लाभलेली मंदिरे, लेणी, स्तूप, दर्गा, मठ यांसारख्या तीर्थस्थळांचे ‘धार्मिक पर्यटना’ च्या दृष्टीने मूलभूत संशोधन होणे गरजेचे आहे. धार्मिक पर्यटनाच्या आधारे जिल्ह्याच्या स्थानिक इतिहासासह संस्कृती व लोकजीवनाचाही परिचय होण्यास मदत होईल. धार्मिक पर्यटनास वाव मिळाल्यास येथील ऐतिहासिक तसेच पुरातत्त्वीयदृष्ट्या महत्त्वाची असलेली प्राचीन मंदिरे जगाचे आकर्षणाचा बिंदू ठरतील व याठिकाणी धार्मिक पर्यटन वाढीस लागेल. यास्तव ‘उस्मानाबाद जिल्ह्यातील मंदिरे आणि धार्मिक पर्यटन’ हा विषय सदरील शोध निबंधासाठी निवडला आहे.

**विषय विश्लेषण :**

**१) मंदिर संकल्पना :**

भारतीय इतिहासामध्ये मंदिरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मंदिरालाच 'देवालय' असेही म्हटले जाते. प्राचीन काळी मानव हा नैसर्गिक दैवी शक्तीपासून स्वसंरक्षणासाठी ईश्वराची उपासना करू लागला. मंदिर संरक्षणासाठी मानवाने मंदिरावर गवताचे छत तयार केले. ही वास्तू म्हणजेच 'पर्णकुटी' होय. मंदिराचे प्राथमिक स्वरूप हे उंच कठडा व त्यावर गवताचे छत असेच होते. प्राचीन काळात यज्ञ संस्थेची जागा मंदिरांनी घेतली. मूर्तीपूजेत मंदिर हे महत्त्वपूर्ण घटक असल्याने मूर्तीपूजेच्या प्रथेतूनच मंदिरांची निर्मिती झालेली आहे.

भारतात सर्वप्रथम मौर्यसम्राट अशोक यांच्या काळात 'गुहा मंदिरे' निर्माण केली गेली. बांधीव मंदिरांचा पहिला पुरावा हा राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यातील भारहूत येथे मिळाला आहे. मंदिरे कुठे बांधावीत यांविषयी 'बृहत् संहितेत' वर्णन केले आहे. तसेच 'ऋग्वेद' या पुराण ग्रंथात यक्ष सदनांचा (यक्षवास्तू) असा उल्लेख आढळतो. मंदिरातील देवमूर्तीचे वेगळेपण दिसावे, यांसाठी मूर्ती एका उंच जागी ठेवली जात असे. मंदिराच्या स्वरूपामध्ये बदल होऊन पर्णकुटीचे रूपांतर चापाकार[3] मंदिरात झाले होते. यापुढील काळात ६ व्या व ७ व्या शतकात मंदिराला गर्भगृह, अंतराळ व मंडप यांची योजना करण्यात आली. कालांतराने भारतात मंदिर स्थापत्य शैलीत नागर, द्रविड आणि वेसर या शैली निर्माण झाल्या.

त्याचप्रमाणे मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यास प्राचीन मंदिरांचा वारसा लाभला आहे. जिल्ह्यात चालुक्यशैली व हेमाडपंती शैलीचे मंदिरे आढळतात. त्यामुळे या ठिकाणी धार्मिक पर्यटनास चालना मिळाली आहे.

**२) जिल्ह्यातील प्राचीन वारसा संपन्न मंदिरे :**

**१) त्रिविक्रम मंदिर — तेर**

तेर या ठिकाणी त्रिविक्रमाचे (विष्णू) चे प्राचीन मंदिर आहे. मुळात हे बौध्द चैत्यगृह[4] आहे. कालांतराने या मंदिराचे विष्णू मंदिरात रूपांतर झालेले आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून गर्भगृह व सभामंडप असा पदविन्यास आहे. गर्भगृहात विष्णुची भव्य मूर्ती आहे. मंदिर बांधकामासाठी चिखल व भाजलेल्या मोठ्या विटांचा वापर केला. त्रिविक्रम मंदिराची लांबी ४९ फूट व रूंदी ९३ फूट इतकी आहे. मंदिराचा पृष्ठभाग अर्धवर्तुळाकृती असून त्यावरील छत गजपृष्ठाकृती (हत्तीच्या पाठीच्या आकाराचे) आहे. तेर येथील बौध्द चैत्यगृह व चेझर्ला[5] (आंध्रप्रदेश) येथील बौध्द चैत्यगृहामध्ये साम्य आढळते. भारतातील प्राचीन मंदिराच्या श्रेणीमध्ये त्रिविकृम मंदिराची गणना केली जाते.

**२) महादेव मंदिर — माणकेश्वर**

परंडा तालुक्यात माणकेश्वर येथे महादेवाचे यादवकालीन प्रसिध्द मंदिर आहे. यादव राजा सिंघणदेव दुसरा याने शके ११४५ म्हणजे इ.स.१२२३ मध्ये हे मंदिर बांधले असून याला 'मल्लिकार्जुन मंदिर'[6] म्हणून ओळखले जाते. हे मंदिर पूर्वाभिमुख असून गर्भगृह, मुखमंडप, अंतराळ असा पदविन्यास आहे. मंदिराचे छत चार कोरीव स्तंभानी तोलून धरले आहे. मंदिरासमोर नंदीमंडप आढळतो. मुख्य गर्भगृहात मोठे शिवलिंग आहे. मुख्य गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराच्या तळाशी शैवव्दारपाल व चामरधारिणी यांची शिल्पे कोरली आहेत. मंदिराच्या बाह्य अंगावरती सूरसुंदरी, मदन, मिथुन, अप्सरा यांची शिल्पे आढळतात. मंदिराच्या मागील बाजूस शेंदूर फासलेले एका पत्रलेखिकेचे[7] सुंदर शिल्पाचे दर्शन घडते. डॉ. प्रभाकर देव[8] यांच्या मते हे १२ व्या शतकाच्या पहिल्या चतुर्थकात माणकेश्वर मंदिराची निर्मिती झाली असावी.

**३) श्री. तुळजाभवानी देवी — तुळजापूर**

तुळजापूर या ठिकाणी श्री. तुळजाभवानीचे प्रसिध्द मंदिर आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी श्री. तुळजाभवानी देवी ही पूर्ण शक्तीपीठ आहे. श्री. तुळजाभवानी देवीला संपूर्ण महाराष्ट्राची 'कुलस्वामिनी'[9] म्हणून ओळखले जाते. मुख्य मंदिराकडे येण्यासाठी दोन प्रवेशव्दार आहेत. डावीकडे कल्लोळ तीर्थ तर उजवीकडे गोमुख तीर्थ आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून गर्भगृह, अंतराळ व सभामंडप असा पदविण्यास आहे. मुख्य मंदिरातील भवानी ही 'अष्टभुजा'[10] महिषासुरमर्दिनीच्या रूपात आहे. ही मूर्ती गंडकी शिळेची असून ती काळी कुळकुळीत आहे. श्री. तुळजाभवानी देवीचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे ही चलमूर्ती आहे. मंदिराचे प्रवेशव्दार चांदीच्या पत्र्याने घडविले असून त्यावर सुंदर नक्षीकाम आढळते. समोरच महादेवाचे मंदिर आहे.

मंदिरासमोर 'होमकुंड' आहे. मंदिर परिसरात अनेक देव-देवतांची मंदिरे आहेत. श्री. तुळजाभवानी देवी ही वर्षातून ३ वेळा निद्रा[11] अवस्थेत असते. देवीचा छबिना व भेंडोळी उत्सव प्रसिध्द असून नवरात्रात येथे मोठी यात्रा भरते. श्री. तुळजाभवानी देवीचे मंदिर हे धार्मिक पर्यटनदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

### ४) श्री दिगंबर जैन सिध्दक्षेत्र (कुंथलगिरी)

भूम तालुक्यातील कुंथलगिरी येथे प्रसिध्द दिगंबर पंथीय जैन मंदिर आहे. हे एक प्रसिध्द सिध्दक्षेत्र (निर्वाणभूमी) आहे. या ठिकाणी कुलभूषण व देशभूषण यांना कैवल्यज्ञान[12] प्राप्त झाले म्हणून येथे यांचे मंदिर बांधलेले आहे. मुख्य मंदिरात कुलभूषण-देवभूषण यांच्या उभ्या मूर्ती आहेत. मुख्य मंदिराच्या उजव्या बाजूस १९७२ साली स्थापन केलेली बाहुबली भगवान यांची १८ फूट उंचीची मूर्ती आढळते. या मंदिराची स्थापना १९३१ साली हरीभाई गांधी व इंदुरचे वेणीचंद मुकुलचंद यांनी केली आहे. मंदिरासमोर आदिनाथ, अजितनाथ यांची मंदिरे आहेत. समोरच मोठे मानस्तंभ आढळते. याच्या बाजूस नंदीश्वर भगवान मंदिर आहे तसेच या ठिकाणी नेमीनाथ, महावीर, पंचमेरू, दत्तात्रय व समवशरण, इ. मंदिरे आहेत. जैन परंपरेनुसार कुलभूषण-देशभूषण हे मुनिसुव्रतनाथ[13] यांच्या समकालीन होते. धार्मिक पर्यटनदृष्ट्या हे अतिशय महत्त्वाचे ठिकाणी असून येथे सर्वधर्मीयांनी पर्यटन करण्याची आवश्यकता आहे.

### धार्मिक पर्यटन :

मानवाचे जन्मापासून स्वतः च्या धर्माशी नाळ जोडली गेल्यामुळे तो धर्माशी बांधला गेला आहे. प्राचीन काळापासून प्रवासाचा उद्देश हा नवीन प्रदेशाचा शोध घेणे, व्यापार करणे व धार्मिक स्थळांना[14] भेटी देणे हा होता. अलीकडील काळात धार्मिक पर्यटनाकडे लोकांचा कल वाढत असताना उस्मानाबादसह मराठवाड्यातील धार्मिक पर्यटन फारच दुर्लक्षित स्वरूपाचे आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात पर्यटनाला चांगली संधी असूनही त्याचे योग्य जतन व संवर्धनाअभावी जिल्ह्याचा वारसा जगासमोर येऊ शकलेला नाही. या ठिकाणी रामलिंग मंदिर, नळदुर्ग आणि परंडा किल्ला, नर-मादी धबधबा, जैन मंदिर, बौध्द लेण्या, दर्गे आणि मठ असा ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनस्थळांचा ठेवा असूनही तो दुर्लक्षितच राहिला आहे. वास्तविक पाहता धार्मिक स्थळे ही आर्थिक उलाढालीची मोठी केंद्र आहेत. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना दिल्यास जिल्ह्याच्या महसूल निधीत भरच पडेल, परंतु धार्मिक पर्यटनाकडे विशेष लक्ष दिले जात नसल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणे आजही उपेक्षित राहिले आहेत.

### सारांश :

एकंदरीत धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला आपला देश धार्मिक वारसा जपणारा एक प्रमुख देश आहे. प्रत्येक धर्मात त्यांचा धार्मिक वारसा जपताना पवित्र धार्मिक स्थळांचा विकास होत गेला. त्यामुळे ती धार्मिक पर्यटनस्थळे म्हणून नावारूपास आली. उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनस्थळांमुळे देश-विदेशातील अनेक पर्यटक येथे भेटी देतात. धार्मिक पर्यटन हे एक असे प्रभावी माध्यम आहे की ज्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील प्राचीन मंदिरांचा स्थानिक इतिहास संपूर्ण जगाला ज्ञात होईल यात शंका नाही.

### शिफारशी :

१) धार्मिक पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी स्थानिक तथा जिल्हा स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.
२) प्राचीन वारसा प्राप्त मंदिरांचे संवर्धन, विकास आणि प्रसिध्दीसाठी स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटक वाढण्यासाठी प्रयत्न करावेत.
३) धार्मिक पर्यटनस्थळी माहिती फलक लावावेत.
४) जिल्हा प्रशासनाने धार्मिक स्थळी स्वच्छतागृहे व निवासाची व्यवस्था यासाठी उपाययोजना करण्यात यावे.

### निष्कर्ष :

१) धार्मिक पर्यटन स्थळांच्या विकासासाठी जिल्हा पातळीवर विशेष उपक्रम शासनामार्फत राबविले जात आहेत.
२) स्थानिक पर्यटनस्थळी स्वच्छतागृहे आणि निवास व्यवस्था यांची कमतरता भासते.
३) धार्मिक ठिकाणी ऐतिहासिक माहिती प्रदान करणारी तथा मनोरंजनाची साधने आणि निसर्ग सौंदर्य यामुळे

उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाकडे पर्यटकांचा ओढा वाढत चाललेला आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) देव प्रभाकर, कल्पना रायरीकर (अनु.), **मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार**, अपरांत प्रकाशन, पुणे, २०१७, पृ. २२.

२) रोडे सोमनाथ (संपा.), **निवडक शोध निबंध**, खंड-२, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, १९९७. पृ.२६.

३) जामखेडकर, पाठक, अ.रा. (संपा.) **महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ**, खंड-१, भाग-२, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ.११९.

४) देव शां.भा., **तेर**, पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.८

५) धम्मपाल रेवण माशाळकर, **चार नवे शोध**, संकल्प प्रकाशन, सोलापूर, २०२२, पृ.२६

६) बाबासाहेब लिंबराज जाधव, मुलाखत, दि.०४/०१/२०२२, माणकेश्वर मंदिर.

७) दैनिक दिव्य मराठी, दि.०६/०८/२०२२.

८) देव प्रभाकर, कल्पना रायरीकर (अनु), पूर्वोक्त, पृ.६९.

९) https://mr.m.wikipedia.org/wiki/तुळजाभवानी_मंदिर

१०) ढेरे रा.चि., **श्री तुळजाभवानी**, पद्मगंधा प्रकाशन, व्दितीय आवृत्ती, पुणे, २००८ पृ.03.

११) संभाजी कदम (भोपे पुजारी), **मुलाखत**, दि.२३/१२/२०२१, तुळजापूर.

१२) मनोज वसंत कांबळे (पुजारी), **मुलाखत**, दि.०३/०१/२०२२, कुंथलगिरी.

१३) मयुरी शहा, कथा कुंथलगिरीची, मॉडर्न ऑफसेट, सोलापूर, २००५, पृ.६.

१४) https://mr.m.wikipedia.org/wiki/पर्यटन